# महाराष्ट्र शासन

**अधिष्ठाता यांचे कार्यालय, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, वजिराबाद, नांदेड**

**OFFICE OF THE DEAN, GOVT. AYURVED COLLEGE,VAZIRABAD,NANDED**

**Ph & Fax No.(02462)234026** **email-gac.nanded@gmail.com**

जा.क्र.शाआमनां/विवि/डे-३/ 8738 /2021 Dt. 17/12/2021

## महत्वाची सुचना

विषय :- विद्यापीठाच्या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाचे परीक्षा शुल्क / पात्रता शुल्क जमा करावयाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्याबाबत.

संदर्भ :- परिपत्रक क्रमांक मआविवि/वित्त/७८८/२०१८, दिनांक ०७/०७/२०१८

या महाविद्यालयातील सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, विद्यापीठाच्या संदर्भित पत्रान्वये विद्यापीठाचे परिक्षा शुल्क / पात्रता शुल्क हे कार्यालयात रोख स्वरुपात स्विकारले जाणार नाही. तरी सदरील संदर्भित परिपत्रकान्वये प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतः www.muhs.ac.in या संकेतस्थळावर जाऊन खालील कार्यपध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन पध्दतीने NET BANKING, SMART CHECKOUT, BHIM, CREDIT CARD, DEBIT CARD व्दारे विद्यापीठाचे परीक्षा शुल्क व पात्रता शुल्क भरण्याची कार्यवाही करावी. विद्यापीठास परिक्षा शुल्क / पात्रता शुल्क जमा पावतीची प्रिंटची प्रत सादर करावी. याची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे परीक्षा शुल्क /पात्रता शुल्क विद्यापीठाच्या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने जमा करण्यासाठी खालील कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

१) विद्यापीठाच्या www.muhs.ac.in या संकेतस्थळावर उजव्या बाजूला असलेल्या PAY ONLINE FEES या टॅबवर क्लिक करावे.

२) FEES TYPE मध्ये दोन पर्यायापैकी UNIVERSITY FEES या टॅबवर क्लिक करावे. विद्यापीठातील ज्या विभागाशी संबंधित शुल्क जमा करावयाचें आहे तो विभाग (SECTION) निवडावा.

३) तो विभाग सिलेक्ट झाल्यानंतर त्याखाली दिलेल्या GO या टॅबवर क्लिक करावे.

४) GO या टॅबवर क्लिक केल्यानंतर स्क्रीनवर दिसत असलेल्या विंडोजमध्ये अचूक माहिती भरावी.

५) संपूर्ण माहिती भरताना नाव, पत्ता, मोबाईल नंबर व स्वतःचा ई-मेल आयडी अत्यंत काळजीपूर्वक भरावा. कारण पावतीचा मेल व मेसेज मोबाईल नंबर व ई-मेल वर जाईल.

६) संपूर्ण माहिती भरुन झाल्यावर PAY NOW या टॅबवर क्लिक करावे.

७) PAY NOW या टॅबवर क्लिक झाल्यानंतर स्क्रीनवर आपण भरलेली पूर्ण माहिती दिसेल, ती पुन्हा एकदा तपासून घ्यावी व CONFIRM या टॅबवर क्लिक करावे.

८) CONFIRM या टॅबवर क्लिक केल्यानंतर स्क्रीनवर आयडीबीआय बॅंकेचे PAYMENT GATEWAY PORTAL दिसेल. त्यामध्ये आवश्यक ती माहिती भरुन SMART CHECKOUT, BHIM, CREDIT CARD, DEBIT CARD, NET BANKING इ.या पर्यायांपैकी आपण ज्या पर्यायाने फी भरणार आहेत. त्यापैकी आवश्यक त्या पर्यायावर क्लिक करुन रक्कम भरावी.

वरीलप्रमाणे रक्कम भरणा यशस्वी झाल्यानंतर SYSTEM GENERATED RECEIPT दिसेल. सदर पावतीचा ई-मेल संबंधिताच्या ई-मेल आयडीवर जाईल व त्याचा मेसेज देखील संबंधिताच्या मोबाईलवर येईल. त्या जमा पावतीची प्रिंटची प्रत विद्यापीठास सादर करावी.

(वैद्य वाय.आर.पाटील)
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,नांदेड

प्रति,

१) सुचना फलक, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड

२) विभाग प्रमुख (सर्व विभाग) शा.आ.म.नांदेड यांना देवून कळविण्यात येते की, सर्व अध्यापकांनी विद्यार्थ्यांना विद्यापीठाचे शुल्क उपरोक्त प्रमाणे ऑनलाईन भरण्याबाबत सुचित करावे.